# महाराष्ट्र शासन
## वनविभाग
# मुख्य वनसंरक्षक,चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर यांचे कार्यालय

चंद्रपूर वन प्रशासन,विकास व व्यवस्थापन प्रबोधिनी,चंद्रपूर परिसर, मुल रोड, चंद्रपूर-४४२४०१

दुरध्वनी क्रमांक:०७१७२-२५६२७९/२७७२३२ ७५८८७४८८९५ ई-मेल:-ccftchandrapur@mahaforest.gov.in

क्रमांक कक्ष-७ (२)/आस्था /प्र.क्र.८५(२५-२६)/२६-२७/ **१७९** चंद्रपूर-४४२४०१ दिनांक **१७ /०७/२०२६**

**आदेश/ई-मेलव्दारे**

**विषय :-** **वनरक्षक ( गट-क ) या पदावरुन वनपाल ( गट-क ) या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देणेबाबत.**

**संदर्भ:-** १) सामान्य प्रशासन विभाग,शासन निर्णय क्रं. एसआरव्ही -२०१८ / प्र.क्र.१५९ / कार्यासन १२,दि.१/८/२०१९
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक :बीसीसी २०१८/ प्र.क्र.३६६/१६-ब दिनांक ०७ मे २०२१
३) महसूल व वनविभाग, मुंबई यांचेकडील पत्र क्रं. कक्ष -१०(२)/ आस्था / एक / प्र.क्र.६४/९१२/१२-१३ दिनांक ७ सप्टेंबर २०१२
४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( प्रशासन-दुय्यम संवर्ग ) म.रा.नागपूर यांचे पत्र क्रं.कक्ष-१०(२)/आस्था/ एक/प्र.क्र.२०८/१७-१८/१११६,दिनांक ११/१२/२०२५

****

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७ मे,२०२१ मधील तरतुदीनुसार मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रं.२८३०६/२०१७ या प्रकरणी अंतिम निर्णय झालेला नसल्यामुळे मा. सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन पदोन्नतीच्या कोटयातील रिक्त असलेली सर्व पदे कोणत्याही प्रकारच्या आरक्षणाचा विचार न करता दिनांक २५.५.२००४ रोजीच्या सेवा जेष्ठतेच्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात यावीत असे निर्देशीत केलेले आहे. त्यानुसार चंद्रपूर वनवृत्तांतर्गत ( तत्कालीन उत्तर चंद्रपूर ) वनरक्षक पदावरुन वनपाल या पदावर पदोन्नती देण्यासंदर्भात विभागीय पदोन्नती समितीची बैठक दि.१३.०३.२०२६ रोजी संपन्न झालेली असून, विभागीय पदोन्नती समितीकडुन वनरक्षक पदावरुन वनपाल पदावर पदोन्नती देण्याकरिता पात्र कर्मचाऱ्यांची निवडसुची तयार करण्यात आलेली आहे.

२.०० विभागीय पदोन्नती समितीने केलेल्या शिफारशीनुसार निवड सुचीतील तत्कालीन उत्तर चंद्रपूर वनवृत्ताचे आस्थापनेवरील खालील वनरक्षक संवर्गातील कर्मचारी यांना वनपाल या पदावर सातव्या वेतन आयोगातील वेतन मॅट्रीक्स मधील **एस-९ ( २६४००-८३६०० )** या सुधारीत वेतनश्रेणीत मा. उच्च न्यायालय,नागपूर येथे दाखल मुळ याचिका क्रं.७६८३/२०१८, मा.प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपिठ, नागपूर येथे दाखल मुळ अर्ज क्रमांक ९४४/२०२४ , मुळ अर्ज क्रमांक ७१४/२०२४ या याचिकेचे अधिन राहुन **निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती**. देण्यात येत असून, त्यांचे नावासमोर नमुद खालील पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्रं. | निवड सुचीतील अ.क्रं./जे.क्र. | वनरक्षकाचे नाव ( सर्वश्री ) | कार्यरत वनविभाग | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना केलेले पद, परिक्षेत्र व वनविभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ४४/३८२ | निलेश विनायक निरांजने | चंद्रपूर | खुला | उपक्षेत्र-अंतरगाव<br>परिक्षेत्र-विरुर<br>वनविभाग-मध्य चांदा | रिक्त पदावर |

Office of the Chief Conservator of Forests (T) Chandrapur

| अ. क्रं. | निवड सुचीतील अ.क्रं./जे.क्र. | वनरक्षकाचे नाव ( सर्वश्री ) | कार्यरत वनविभाग | पदोन्नतीचा प्रवर्ग | पदोन्नतीने पदस्थापना केलेले पद, परिक्षेत्र व वनविभाग | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ४६/३८५ | श्रीमती कौशल्या राममनोहर सिंह | मध्य चांदा | खुला | वनपाल,संरक्षण व अतिक्रमण निर्मुलन,खडसंगी ब्रम्हपूरी वनविभाग | दिनांक ३१.७. २६ रोजी से.नि.ने रिक्त होणाऱ्या पदावर |
| ३ | ४७/३८७ | जितेंद्र शंकर वैद्य | कोअर | खुला | उपक्षेत्र-मोहर्ली ( कोअर ) परिक्षेत्र-मोहर्ली ( कोअर ) वनविभाग-कोअर,ता.अं.व्या.प्र. | रिक्त पदावर |
| ४ | ४८/३८८ | हर्षानंद सुखदेव भवरे | कोअर | खुला | वनपाल, रोपवाटीका खडसंगी परिक्षेत्र-चिमूर वनविभाग-ब्रम्हपूरी | रिक्त पदावर |

**२. वरिल कर्मचाऱ्यांना तात्पुरत्या स्वरुपात खालील अटींच्या अधीन राहुन पदोन्नती देण्यात येत आहे.**

१.० मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रं. २७९७/२०१५ मध्ये दि.०४/०८/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रं. २८३०६/२०१७ च्या निर्णयाच्या अधिन राहुन प्राप्त मान्यतेस अनुसरुन तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७/०५/२०२१ च्या शासन निर्णयामधील सुचनांनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

२.० सदर पदोन्नती मा. उच्च न्यायालय,नागपूर येथे दाखल मुळ याचिका क्रं.७६८३/२०१८, मा.प्रशासकीय न्यायाधिकरण खंडपिठ, नागपूर येथे दाखल मुळ अर्ज क्रमांक ९४४/२०२४, मुळ अर्ज क्रमांक ७१४/२०२४ तसेच मुळ अर्ज क्रमांक २२२/२०२५ या प्रलंबित याचिकेच्या अधीन राहील.

३.० सदर पदोन्नती मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई / नागपूर औरंगाबाद तसेच मा. उच्च न्यायालय/ मा. सर्वोच्च न्यायालय इत्यादी ठिकाणी जेष्ठतेबाबत काही दावे/याचिका दाखल केले असल्यास, सदर प्रलंबित याचिकेच्या अधीन राहील.

४.० हया आदेशाव्दारे पदोन्नत करण्यात आलेले कर्मचारी ज्या तारखेला पदस्थापनेच्या ठिकाणी रुजु होतील, त्या तारखेला त्यांची पदोन्नतीचे पदावर वेतन निश्चिती करण्यात येईल, तथापी, ज्या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजनेतंर्गत किंवा आश्वासति प्रगती योजने अंतर्गत वनरक्षक या संवर्गात वरिष्ठ वेतन श्रेणी आधीच लागु करण्यात आली असेल, अशा कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती पुन्हा करण्यात येणार नाही.

५.० सदर पदोन्नती तात्पुरत्या स्वरुपात असल्याने परिस्थितीनुरुप आवश्यक वाटल्यास पदोन्नतीचे आदेश रद्दबादल करण्यात येईल किंवा आवश्यकतेनुसार कनिष्ठतम कर्मचाऱ्यास पदावनत करण्यात येईल.

६.० ज्या कर्मचाऱ्याविरुध्द सदर आदेश प्राप्त होण्यापुर्वी विभागीय चौकशी सुरु करण्यात आली अथवा संबधितास निलंबनाखाली ठेवण्यात आले असेल तर सदर पदोन्नतीचा आदेश लागु होणार नाही.

७.० ज्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना मागासवर्गीय बिंदुवर नियुक्ती देण्यात आली आहे किंवा ज्या कर्मचाऱ्यांचा मागासवर्गीय जातीचा दावा आहे अशा कर्मचाऱ्यांची भविष्यात त्यांचे मागासवर्गीय प्रवर्गात समायोजन करावयाचे असल्याने जात वैधता प्रमाणपत्राची आवश्यकता राहील. अशा प्रकरणीं संबधित कर्मचाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र तपासणीमध्ये खोटे असल्याचे आढळून आल्यास त्यांना तात्काळ पदावनत करण्यात येईल व त्यांचे विरुध्दं कायदेशिर कारवाई करण्यात येईल

८.० महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- वशिअ-१२१४/प्र.क्र.२६/११, दिनांक २ जून, २०१४ अन्वये पदोन्नती करिता मत्ता व दायित्व यांची वार्षिक विवरणपत्र सादर करणे अनिवार्य असल्याने संबधित कार्यालय प्रमुखाने सदर विववरणपत्र सादर केल्याबाबतची खात्री करुनच पदोन्नतीचे आदेश संबधित कर्मचाऱ्यास हस्तांतरीत करावे, अन्यथा तसे या कार्यालयास पुढील कार्यवाहीस अवगत करावे.

Office of the Chief Conservator of Forests (T.) * Chandrapur *

९.० महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकः-एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.३०३/का-१२, दिनांक १२ सप्टेंबर, २०१६ अन्वये वरच्या संवर्गात पदोन्नतीसाठी निवड झाल्यानंतर पदोन्नती नाकारणाऱ्या कर्मचाऱ्याचे नाव निवड यादीतून काढून टाकण्यात येईल व पुढील २ वर्षे होणाऱ्या निवड सुचीमध्ये संबधित कर्मचाऱ्यांच्या नावाचा विचार करण्यात येणार नाही. तसेच त्यांना यापूर्वी आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत लाभ दिले असल्यास ते काढून घेण्यात येतील, याची कृपया नोंद घ्यावी.

संबधित नियंत्रक अधिकारी यांनी त्यांचे विभागातील उपरोक्त पदोन्नत कर्मचारी यांचेकडुन उपरोक्तप्रमाणे नमुद अ.क्रं.१ ते ९ वरिल अटी व शर्ती मान्य असल्याचे लेखी बंधपत्र प्राप्त करुन घ्यावे. त्याबाबतची नोंद संबधिताचे सेवापुस्तकात घ्यावी. बंधपत्र सेवापुस्तकात जतन करावे व तद्नंतरच स्थानिक व्यवस्था करुन संबधित कर्मचारी यांना पदोन्नतीने पदस्थापना झालेल्या पदावर रुजु होणेस्तव कार्यमुक्त करावे व तसा अहवाल सादर करावा.

Office of the Chief Conservator of Forests (T.) * Chandrapur *

(आर.एम.रामानुजम)
मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त,चंद्रपूर

प्रति,

१) उपवनसंरक्षक,ब्रम्हपूरी वनविभाग,ब्रम्हपूरी
२) उपवनसंरक्षक,मध्य चांदा वनविभाग,चंद्रपूर
३) विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग,चंद्रपूर
४) उपसंचालक ( कोअर ) ता.अं.व्या.प्र.चंद्रपूर
५) संबधित पदोन्नत कर्मचारी ( मार्फत-संबधित वनविभाग )

प्रतिलिपीः- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक ( प्रशासन-दुय्यम संवर्ग ) म.रा.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
प्रतिलिपीः- मुख्य वनसंरक्षक ( प्रादेशिक ) गडचिरोली यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.
प्रतिलिपीः- वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक,ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प,चंद्रपूर यांना माहितीस अग्रेषित.